**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**
**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे पालघर जिल्हा)**
**(०२३५८) २८२३८७**

**अंक ६१/२०१८** **दिनांक ३१/०७/२०१८** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. सुभाष चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविद्या विभाग
९४२२४३१०६७

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविद्या विभाग
९४२२३७४००१

**प्रा. विरेश चव्हाण,**
तांत्रिक अधिकारी,
कृषिविद्या विभाग
९४२२०६५३४४


| **मागील हवामान आठवडा सारांश दि. २७/०७/२०१८ ते ३१/०७/२०१८** | | |
|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | ०.० |
| पाऊस (मिमी) १/१/१८ पासून | : | ०.० |
| पाऊस (मिमी) (गेल्या वर्षी) | : | २८३४.२ |
| कमाल तापमान (अं.से) | : | ३२.६–३७.० |
| किमान तापमान (अं.से) | : | २२.६–२७.८ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ७६–८२ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ५७–६८ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ३.३–५.० |

**हवामान पूर्वानुमान (०१/०८/२०१८ सकाळी ८:३० पासून ०५/०८/२०१८ सकाळी ८:३० वाजेपर्यंत)**

| **हवामानांचे घटक** | : | **०१/०८** | **०२/०८** | **०३/०८** | **०४/०८** | **०५/०८** |
|---|---|---|---|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | ८ | ७ | ८ | ३४ | ३६ |
| कमाल तापमान (अं.से) | : | ३२ | ३३ | ३३ | ३२ | ३१ |
| किमान तापमान (अं.से) | : | २७ | २७ | २७ | २६ | २६ |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | : | ८ | ७ | ७ | ५ | ६ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ९६ | ९७ | ९७ | ९७ | ९८ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ८६ | ८६ | ८२ | ८४ | ८८ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ०१० | ०१० | ००९ | ००७ | ००७ |
| वाऱ्याची दिशा | : | नै.प. | नै.द. | नै.द. | नै.द. | नै.प. |

**:हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला:**

**दिनांक १ ते ५ ऑगस्ट, २०१८ पर्यंत पावसाची शक्यता आहे. दिनांक १ ते ५ ऑगस्ट, २०१८ पर्यंत अवकाश मेघाच्छादित राहिल. दिनांक १ ते ५ ऑगस्ट, २०१८ पर्यंत वाऱ्याचा वेग ७ ते १० किमी प्रति तास राहिल.**

| **पिक** | **पिक अवस्था** | **कृषि सल्ला** |
|---|---|---|
| **नागली** | **लावणी** | • पुर्नलागवडीसाठी ३० दिवसांची रोपे वापरावीत. अधिक उत्पन्न मिळण्यासाठी रोपे २० x १५ सें. मी. अंतरावर ठोंबा पध्द्तीने उथळ आणि उभी लावावीत. ठोंबे उताराच्या आडव्या दिशेने करावेत.<br>• लावणी करताना प्रती हेक्टरी ४० किलो नत्र, ४० किलो स्फुरदची मात्र द्यावी. खते फोकून न देता ठोंब्यामध्ये द्यावीत. |
| **भात** | **लावणी** | • चिखळणीच्या वेळी ४० किलो नत्र, ५० किलो स्फुरद आणि ५० किलो पालाया प्रती हेक्टर खताची मात्रा द्यावी.<br>• भाताच्या रोपांची लावणी २० x १५ सें. मी. अंतर ठेवून करावी. लावणी सरळ आणि उथळ (२.५ ते ३.५ सें. मी. खोल) करावी. उथळ लावणी केल्याने फुटवे चांगले येतात. एका चुडात तीन रोपे लावावीत संकरित भातासाठी एका ठिकाणी एकच रोप लावावे.<br>• बांधावरील खेकडयांचा बंदोबस्त करावा त्यासाठी १ किलो शिजलेल्या भातामध्ये ७५ टक्के पा.मि. ॲसिफेट पावडर ७५ ग्रॅम किंवा पा.मि. कार्बारिल भूकटी १०० ग्रॅम टाकून विषारी अमिष तयार करावे. या मिश्रणाच्या साधारणपणे १०० गोळया तयार करून प्रत्येक बिळाच्या आत तोंडाशी एक गोळी ठेवावी व बीळ बुजवावे, दुसऱ्या दिवशी जी बीळे उकरली जातील अशा बिळात परत अमिष वापरावे.<br>• रोप वाटिकेतील रोपे जर १२ ते १५ सें. मी. उंचीची पाच ते सहा पाने फुटलेली २२ ते २५ दिवसांची झाली असतील तर भात पिकाची पुर्नलागण सुरू करावी.<br>• पर्जन्यमानाचा अंदाज कमी वर्तवल्यामुळे पर्यायी पाण्याची व्यवस्था करून लावणी लवकरात लवकर पूर्ण करावी. |
| **चिकू** | **लागवड व बागेची निगा** | • चिकू लागवडीसाठी १० x १० मीटर अंतरावर १ x १ x १ मीटर आकाराचे खड्डे खणून ते चांगली माती आणि ३–४ घमेले शेणखत, २ किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि वाळवीच्या नियंत्रणासाठी १०० ग्रॅ. फॉलीडॉल पावडर किंवा ५० ग्रॅम दाणेदार क्लोरोफायरीफॉस या मिश्रणाने भरून ठेवावेत.<br>• चिकूची फळगळ रोखण्यासाठी मेटॅलॅक्स ५८ टक्के + मॅन्कोझेब ६५ टक्के यांची ०.२ टक्के या प्रमाणात फळधारणा सुरू होताना फवारणी करावी. पावसाळयात ०.२ टक्के या प्रमाणात चिकटणाऱ्या पदार्थाचा वापर करावा. यापुढील फवारण्या एक महिन्यात अंतराने घ्याव्यात आणि एकूण तीन फवारण्या घ्याव्यात. |
| **नारळ/ सुपारी** | --- | • नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये शेणखताच्या खड्ड्यात दर दोन महिन्यांनी कार्बारील पावडरचे (१० लिटर पाण्यात २० ग्रॅम) मिश्रण तयार करून फवारावे.<br>• नारळावरील सोंडया भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंग्यानी पाडलेली भोके १० टक्के कार्बारील भुकटी व वाळूने बुजवून घ्यावीत. तसेच खोडावर १ मिटर उंचीवर गिरमिटाच्या सहाय्याने १५ ते २० सें.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० मिली ३६ टक्के प्रवाही मोनोक्रोटोफॉस किंवा २० टक्के प्रवाही क्लोरोपायरीफॉस नरसळयाच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे.<br>• तीन वर्षावरील प्रत्येक सुपारीच्या झाडास १ घमेल शेणखत किंवा कंपोस्ट खत, १२ किलो हिरवळीचे खत, १६० ग्रॅम युरिया, ५०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट, १२५ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश खत द्यावे.<br>• नारळ आणि सुपारी बागेत पावसाचे अतिरक्त पाण्याचा निचरा होणेसाठी चर खोदून घ्यावेत.<br>**टिप:–** पावसाची तिव्रता कमी असताना खते द्यावीत. |
| **भाजीपाला आणि फळबाग रोपवाटीका** | – | • वेलवर्गीय भाज्यांना काठीचा आधार द्यावा. भाजीपाला क्षेत्रातील तणांचा बंदोबस्त करावा. तसेच प्रती गुंठ क्षेत्रास ७२० ते ८५० ग्रॅम युरिया खताचा एक तृतीयांश हप्ता द्यावा अणि मंडपाची व्यवस्था करावी. .<br>• रोपवाटिकेतील पाण्याचा निचरा होणेसाठी चर खोदून घ्यावेत.<br>• आंबा बाठा कलमे १० ते १२ जूलै पूर्वी बांधून पूर्ण करावीत म्हणजे कलमे जगण्याचे प्रमाण चांगले राहिल. |
| **दुभती जनावरे/ शेळया/ कुकुटपालन** | – | • जनावराना पाणी पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच गोठयामधे हवा खेळती राहिल याची काळजी घ्यावी.<br>• जनावरांना हिरव्या चाऱ्यासाठी झुडूपवर्गीय व बहुवर्षीय वैरणीच्या पिकांची लागवड करावी.<br>• दुभत्या जनावरांना १ ते १.५ किलो खुराक, १५ ते २० किलो हिरवी वैरण व ४ ते ५ किलो वाळलेली वैरणी द्यावी.<br>• सर्वसाधारण एका शेळीस ३–४ किलो हिरवा चारा, २ ते २.५ किलो वाळलेला चारा व ३०० ग्रॅम खुराक प्रतिदिन दयावा.<br>• जनावरांचे येणाऱ्या पावसापासून योग्यते संरक्षण करावे. बांधावे.<br>• ब्रॉयलर पक्षांना पहिले तीन आठवडे त्यांच्या वजनानुसार ब्रॉयलर स्टार्टर व पुढे म्हणजेच चार–सहा आठवडयांपर्यंत ब्रॉयलर फीनीशर खाद्य द्यावे. |
| **सुचना** | – | • निरनिराळे किडी, रोग जास्त प्रमाणात आढळल्यास नजिकच्या कृषि विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. |